जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2024
लोकमत

# 'मधुबाला' लघुपटाचे विद्यापीठात स्क्रीनिंग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात सुरू असलेल्या बीए फिल्म मेकिंग कोर्सचा प्रारंभ सोमवारी होत आहे. यानिमित्ताने दुपारी २ वाजता ख्यातनाम स्टोरीबोर्ड रायटर, चित्रकार आणि दिग्दर्शक स्वप्निल पाटील यांच्या 'मधुबाला' या लघुपटाचे स्क्रीनिंग होणार आहे. त्यानंतर पाटील 'लघुपट निर्मितीची प्रक्रिया' या विषयावर संवाद साधणार आहेत.

विद्यापीठात शैक्षणिक वर्षापासून बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतर तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू केला आहे. या अभ्यासक्रमासाठी राज्याच्या विविध भागांतील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने विद्यापीठ स्तरावर चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास, अध्ययन आणि अध्यापन होणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या 'मधुबाला' लघुपटाचे स्क्रीनिंग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात सुरू असलेल्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचा प्रारंभ सोमवारी (दि.१५) होत आहे. यानिमित्ताने दुपारी दोन वाजता स्टोरीबोर्ड रायटर, चित्रकार, दिग्दर्शक स्वप्निल पाटील यांच्या 'मधुबाला' या लघुपटाचे स्क्रीनिंग होणार आहे. त्यानंतर 'लघुपट निर्मितीची प्रक्रिया' या विषयावर पाटील संवाद साधणार आहेत. बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या निमित्ताने प्रथमच विद्यापीठीय स्तरावर चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास, अध्ययन आणि अध्यापन होणार आहे. याचाच एक भाग म्हणून स्वप्निल पाटील यांच्या 'मधुबाला' या लघुपटाचे विभागात स्क्रीनिंग होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2024
पुण्यनगरी

# 'मधुबाला' लघुपटाचे उद्या विद्यापीठात स्क्रीनिंग

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात सुरू असलेल्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचा प्रारंभ सोमवार, दि. १५ जुलै रोजी होत आहे. यानिमित्ताने दुपारी २ वाजता ख्यातनाम स्टोरीबोर्ड रायटर, चित्रकार आणि दिग्दर्शक स्वप्नील पाटील यांच्या 'मधुबाला' या लघुपटाचे स्क्रीनिंग होणार आहे. त्यानंतर स्वप्नील पाटील 'लघुपट निर्मितीची प्रक्रिया' या विषयावर उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. शिवाजी विद्यापीठात चालू शैक्षणिक वर्षापासून बी. ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतर तीन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या निमित्ताने प्रथमच विद्यापीठीय स्तरावर चित्रपटाचा शास्त्रीय अभ्यास, अध्ययन आणि अध्यापन होणार आहे. याचाच एक भाग म्हणून स्वप्नील पाटील यांच्या 'मधुबाला' या लघुपटाचे विभागात स्क्रीनिंग करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी मोफत असून, सिनेरसिक नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2024
सकाळ

# महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंचे योगदान मोलाचे : डॉ. पाटील

कोल्हापूर, ता. १३ : ''महाराष्ट्रातीलच नव्हे, तर संपूर्ण भारतातील एक क्रांतिकारक आणि कर्ते समाजसुधारक म्हणून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे योगदान मोलाचे आहे. सध्याच्या परिस्थितीतही त्यांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे,'' असे मत डॉ. भारती पाटील यांनी व्यक्त केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातील कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संशोधन केंद्रातर्फे त्यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त घेतलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण झाले. यावेळी डॉ. पाटील बोलत होत्या. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. या संशोधन केंद्रासाठी त्यांनी पाटील यांनी पाच हजार रुपयांची देणगी जाहीर केली. प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी संशोधन केंद्राची माहिती दिली. केंद्र समन्वयक डॉ. सरोज पाटील यांनी स्वागत केले. डॉ. सुरेश शिखरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. ग्रंथपाल डॉ. पांडुरंग पाटील यांनी निबंध स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांची माहिती दिली. प्रा. पी. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. निबंध स्पर्धेतील विजेते असे :

करुणा यादव (शिवाजी विद्यापीठ), शितल सुतार (राधानगरी महाविद्यालय), गीतांजली वाडेकर (मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय बोरगाव), उत्तेजनार्थ : शर्वरी शिंदे (पाटील महाविद्यालय कळे), धनश्री मोरे (श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUL 2024
पुढारी

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## मराठी विभाग

## मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम

### - प्रवेश सूचना -

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागामार्फत मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविला जाणार आहे. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर दि. १५ जुलै ते ३१ जुलै २०२४ या मुदतीमध्ये रजिस्ट्रेशन करावे व अर्जाची प्रत मराठी अधिविभागात जमा करावी. या संदर्भात काही अडचण असल्यास ०२३१-२६०९२१५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| पात्रता | - पदवी (सर्व विद्याशाखा) |
| अभ्यासक्रम कालावधी | - १ महिना |
| परीक्षेचे स्वरूप | - लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा |
| प्रवेश फी | - १०००/- रूपये |
| रजिस्ट्रेशन लिंक | - http://www.unishivaji.ac.in/ |

ठिकाण : कोल्हापूर
दि. १४/०७/२०२४

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

14 JUL 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# थायरॉईड आजाराचे होणार अचूक निदान

## 'थायरॉईड डिसिज प्रीडिक्शन वेब ॲप्लिकेशन' तयार; शिवाजी विद्यापीठातील प्रा. परशुराम वडार यांचे संशोधन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र विभागातील प्रा. परशुराम वडार यांनी संशोधनामध्ये मशीन लर्निंगचा वापर करून स्ट्रिमलिट पायथन फ्रेमवर्कच्या साहाय्याने 'थायरॉईड डिसिज प्रीडिक्शन वेब ॲप्लिकेशन' तयार केले आहे. या संशोधनामुळे थायरॉईड आजाराचे अचूक निदान होण्यास मदत होणार आहे.

राज्यासह देशभरात थायरॉईड विकारांचा धोका वाढला असून, रुग्णांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. महिलांना थायरॉईडचा आजार होण्याची शक्यता पुरुषांपेक्षा पाच ते आठपट जास्त आहे. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण आयव्हीनुसार, १५ ते ४९ वयोगटातील महिलांना थायरॉईड विकारांचा धोका असल्याचे निदर्शनास आले आहे. उत्तर व दक्षिणेकडील राज्यातील महिलांमध्ये गलगंड किंवा इतर थायरॉईड विकारांचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्रामध्ये १ लाख





स्त्रियांमध्ये २१२६ स्त्रिया थायरॉईड आजाराने त्रस्त आहेत.

मशीन लर्निंग हा कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा एक भाग आहे. ज्यामध्ये मशीनला प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून ते मानवी मेंदूसारखे निर्णय घेऊ शकेल. प्रा. वडार यांनी विज्ञान तंत्रज्ञान शाखेअंतर्गत पीएच.डी. संशोधनामध्ये मशीन लर्निंगचा वापर थायरॉईड रोगाचे अचूक निदानासाठी केला आहे. संशोधन अभ्यासासाठी कोल्हापूर व शेजारील जिल्ह्यातील १२९४ थायरॉईड रुग्णांची माहिती घेण्यात आली. ज्यात ग्रामीण व शहरी भागातील २४० पुरुष व १०४८ स्त्रिया यांचा समावेश आहे. थायरॉईडच्या आजारांचे निदान करण्यासाठी रक्ताची चाचणी केली जाते. ज्यामध्ये टी-३, टी-४, टीएसएच, एफटी-३, एफटी-४ यांची हार्मोनल पातळी तपासली जाते. अभ्यासात यांची माहिती घेऊन विविध माध्यमातून विश्लेषण करण्यात आले.

मशीन लर्निंगमधील मूलभूत अल्गोरिदम माहिती वापरून त्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. प्रत्येक मॉडेलचे कार्यप्रदर्शन मूल्यमापन करण्यासाठी विविध एकके वापरण्यात आली. प्रत्येक अल्गोरिदमचे ताकद व कमकुवतपणा यांचा विचार करून स्टॅकिंग तंत्राचा वापर करण्यात आला. यापासून थायरॉईडच्या आजारांचे अचूक निदानासाठी 'थायरॉईड डिसिज प्रीडिक्शन वेब ॲप्लिकेशन' विकसित करण्यात आले. या ॲप्लिकेशनमध्ये वय, लिंग यांची माहिती भरल्यावर थायरॉईड आजाराचा प्रकार ॲप्लिकेशनकडून वापरकर्त्याला दाखवला जातो. यामुळे आजाराची माहिती मिळते.

> थायरॉईडची वाढती रुग्णसंख्या विचारात घेता, वेब ॲप्लिकेशनचा उपयोग डॉक्टरांना थायरॉईड आजाराचे अचूक निदान करण्यासाठी सहायक म्हणून करता येणे शक्य होईल. ज्याद्वारे त्यांच्यावरील कामाचा ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. थायरॉईड रोगाचे अचूक निदान होण्यास मदत होईल.
>
> **- प्रा. परशुराम वडार,**
> संशोधक, शिवाजी विद्यापीठ